दै. पुण्यनगरी दि. 10-10-24

# वाळूची अवैध वाहतूक ; ४३ लाखांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड / प्रतिनिधी**

शहर व परिसरात अजूनही वाळू, गौण खनिजाची अवैध वाहतूक खुलेआम सुरु आहे. नाही म्हणायला पोलिस थातूरमातूर कारवाई करीत आहेत. दोन ठिकाणी पोलिसांनी वाळूची दोन वाहने पकडून दोघांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

नांदेड शहरातील विद्युतनगर कॉर्नरजवळ सार्वजनिक रस्त्यावर दि. ८ ऑक्टोबर रोजी मध्यरात्री वाळूची अवैध वाहतूक करणारे वाहन पोलिसांना दिसले. त्यांनी हे वाहन थांबवून चालकाकडे कागदपत्रांची मागणी केली असता त्याच्याकडे वाळू वाहतुकीचा अधिकृत परवाना नव्हता. त्यामुळे पोकाँ ज्ञानेश्वर भिसे यांनी हे वाहन क्रमांक एमएच २६ सीएच ७७७८ हे ताब्यात घेऊन विमानतळ पोलिस ठाण्यात लावले.

या वाहनाची किंमत ८ लाख असून त्यातून ४ ब्रास म्हणजे २० हजारांची वाळू जप्त केली. तसेच भिसे यांच्या फिर्यादीवरुन चालक लक्ष्मण सोनटक्के रा.पाखंडेवाडी ता.मुखेड याच्याविरुध्द विमानतळ पोलिस ठाण्यात गुरनं ४१४/२४ कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता २३ दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोहेकाँ कदम करीत आहेत.

## हायवा ताब्यात

नांदेड शहरातील तरोडा बु.जगदीश कॉलनी भागात पोलिसांनी वाळूची अवैध वाहतूक करणारे वाहन पकडले आहे. दि. ८ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजता उपरोक्त जगदीश कॉलनीतून ५ ब्रास वाळूसह हायवा वाहन पोलिसांनी ताब्यात घेतले. या वाहनाचा क्रमांक एमएच २६ बीई २७१७ असून त्यांची किंमत ३५ लाख रुपये आहे. त्यातून ५ ब्रास म्हणजे २० हजारांची वाळू जप्त करण्यात आली. पोकाँ ज्ञानेश्वर भिसे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विमानतळ पोलिस ठाण्यात सुनील नाथराव ठाकूर रा.असर्जन नांदेड याच्याविरुध्द गुरनं ४१४/२४ कलम ३०३ (२) भारतीय न्याय संहिता २३ सह कलम ४८ (७) महाराष्ट्र जमीन महसुल कायद्याप्रमाणे दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास मामीलवाड करीत आहेत.